दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ०७ फेब्रुवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १३५ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


## सुविचार

नात्यांत व्यवहार असतो, पण व्यवहारात नातं हरवू नये; विश्वास, पारदर्शकता आणि आदर टिकले, तर संबंधही मजबूत राहतात आणि व्यवहारही यशस्वी होतात. व्यक्ती प्रामाणिक असेल, तरच नाती फुलतात.

## क्रिप्टो बाजारात हाहाकार!

**नवी दिल्ली** : जगातील सर्वात लोकप्रिय समजल्या जाणाऱ्या 'बिटकॉइन' या क्रिप्टोकरन्सीला मोठा फटका बसला असून, गेल्या तीन महिन्यांत त्याचे मूल्य निम्म्यावर आले आहे. ऑक्टोबरमध्ये १,२६,००० डॉलर या ऐतिहासिक उच्चांकावर असलेल्या बिटकॉइनची किंमत गुरुवारी ६३,००० पर्यंत खाली आली. गेल्या एका वर्षातील ही निचांकी पातळी आहे. या 'क्रॅश'मुळे गुंतवणूकदारांबरोबरच, ज्या कंपन्यांनी बिटकॉइनमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे, त्यांच्या शेअर्समध्येही घसरण झाली.

## सारांश वृत्त

### अभिनेत्री अंजू कृष्णाला चेन्नई येथे अटक

**चेन्नई** : तामिळ आणि मल्याळम चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री अंजू कृष्णा हिला चेन्नईमध्ये अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. अँटी-नार्कोटिक्स इंटेलिजन्स युनिटच्या साऊथ टीमने छापा टाकत ही कारवाई केली. या कारवाईत अंजू कृष्णासह एकूण सात जणांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून ६ ग्रॅम मेथामफेटामाइन, ७ ग्रॅम गांजा, १५ ग्रॅम भांग आणि ९ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. अटक झालेल्यांमध्ये असिस्टंट डायरेक्टर विन्सी निवेधा, कार्तिक राजा, यशवंत, श्रीराम, अल्विबिनशा आणि व्यंकटेश कुमार यांचा समावेश आहे.

### देशात पुन्हा बर्ड फ्लूची एन्ट्री

**चेन्नई** : चेन्नईमध्ये गेल्या काही दिवसांत अत्यंत घातक 'एच५एन१' विषाणूने अंदाजे १,००० ते १,५०० कावळ्यांचा मृत्यू झाला आहे. अड्यार, वेलाचेरी, तिरुवनमियूर आणि ईस्ट कोस्ट रोड या परिसरांमध्ये मोठ्या प्रमाणात बर्ड फ्लूचा संसर्ग पसरला आहे. तामिळनाडू सरकारने हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तातडीने पावले उचलत जनतेसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. केंद्र सरकारने देखील याबाबतचे आवाहन केले आहे.

### लाच प्रकरणी कस्टम अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा

**आयझॉल** : सीबीआयने तस्करांकडून ३५ लाख रुपयांपेक्षा जास्त लाच घेतल्याच्या आरोपाखाली मिझोरममध्ये पूर्वी तैनात असलेल्या तीन कस्टम अधिकाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे, असे एजन्सीने एका निवेदनात म्हटले आहे. निवृत्त अधीक्षक आणि दोन निरीक्षकांसह आरोपींनी बेकायदेशीर लाच घेतल्यानंतर तस्करी केलेल्या वस्तू सोडल्याचा आरोप आहे, असे त्यात म्हटले आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीसाठी राजस्थान सरकारचा ऐतिहासिक निर्णय

# तीन किंवा अधिक मुलांचे पालकही निवडणूक लढवू शकणार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**जयपूर** : राजस्थानमधील भजनलाल शर्मा सरकार राज्याच्या राजकारणात एक मोठा आणि दूरगामी बदल घडवून आणण्याच्या तयारीत आहे. राज्य सरकारने स्पष्टपणे सूचित केले आहे की, पंचायत आणि महानगरपालिका निवडणुकांसाठी दोन मुलांची अट रद्द केली जाईल. विधानसभेत सादर केलेल्या सरकारच्या उत्तरानुसार, तीन किंवा त्याहून अधिक मुले असलेल्या व्यक्ती आता नगरपालिका आणि पंचायत निवडणुका लढवू शकतील. जवळजवळ तीन दशकांपासून सुरू असलेला हा नियम रद्द करण्यासाठी सरकारने पावले उचलली आहेत. हा निर्णय "मिशन 2026" चा एक भाग असल्याचे मानले जाते. ज्याचा उद्देश ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात व्यापक सामाजिक सहभाग सुनिश्चित करणे आहे. विधानसभेत सरकारने दिलेल्या उत्तरानुसार सध्याच्या सामाजिक आणि लोकसंख्याशास्त्रीय परिस्थितीत हा नियम अप्रासंगिक बनला आहे. लोकशाहीमध्ये निवडणूक लढवण्याचा अधिकार कुटुंबाच्या आकाराशी जोडला जाऊ नये असे सरकारचे मत आहे. या निर्णयामुळे विशेषतः ग्रामीण भाग, मागासवर्गीय आणि उपेक्षित समुदायांना महत्त्वपूर्ण राजकीय फायदे मिळू शकतात. या अटीमुळे अनेक सामाजिक कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींना यापूर्वी निवडणूक प्रक्रियेतून वगळण्यात आले आहे. सरकार लवकरच या संदर्भात कायदेशीर प्रक्रिया आणि सुधारणा अंतिम करेल अशी अपेक्षा आहे. विरोधी पक्षही या निर्णयाविरुद्ध आवाज उठवत आहेत. पीसीसी प्रमुख गोविंद सिंह दोतासरा यांनी याला लोकसंख्या नियंत्रण धोरणापासून दूर जाणे असे म्हटले. दोतासरा म्हणाले की, भैरोंसिंग शेखावत यांनी दोनपेक्षा जास्त मुले असलेल्यांना निवडणूक लढवण्यास बंदी घातली होती. परंतु आता तीनपेक्षा जास्त मुले असण्याबाबत संघ प्रमुख मोहन भागवत यांच्या विधानानंतर सरकार त्यांचे अनुकरण करत आहे. हा निर्णय घेत आहे. सरकार याला लोकशाही सुधारणा म्हणून सादर करत आहे. भाजप आमदार गोपाल शर्मा यांनी या निर्णयाबद्दल सांगितले की, "राजस्थानचे माजी मुख्यमंत्री भैरोंसिंग शेखावत यांनी दोनपेक्षा जास्त मुले असलेल्या लोकांना निवडणूक लढवण्यास बंदी घातली होती. त्यावेळी देश लोकसंख्या नियंत्रणाकडे वाटचाल करत होता. त्यावेळी परिस्थिती वेगळी होती आणि आताही वेगळी आहे. सध्याची परिस्थिती पाहता, सरकारचा निर्णय पूर्णपणे योग्य आहे असे मला वाटते. सर्व जाती आणि धर्माच्या लोकांना याचा फायदा होईल. सरकारने हा निर्णय काळजीपूर्वक विचार करून घेतला आहे." राजस्थानने पंचायत आणि नगरपालिका निवडणुका लढवणाऱ्या उमेदवारांसाठी दोन मुलांची मर्यादा बऱ्याच काळापासून लागू केली आहे. लोकसंख्या नियंत्रणाला प्रोत्साहन देण्यासाठी हे करण्यात आले होते, परंतु कालांतराने या नियमाबाबत भेदभाव आणि सामाजिक असमतोलाचे आरोप होऊ लागले आहेत.

# अजून 25 वर्षे शिल्लक आहेत; पीएम मोदींचे सुचक वक्तव्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : दिल्ली / वृत्तसंस्था पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी परीक्षा पे चर्चामध्ये विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी काही राजकीय सुतोवाच देणारी वक्तव्ये देखील केली. मोदींनी विद्यार्थ्यांना गेल्या काळाचा हिशेब ठेवण्यापेक्षा येणाऱ्या भविष्याबाबत विचार करायला हवा असा सल्ला दिला. यावेळी त्यांनी त्यांच्या वाढदिवसाचा एक किस्सा देखील सांगितला. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, मला एका नेत्याने माझ्या वाढ दिवसादिवशी फोन केला होता. 17 सप्टेंबर रोजी फोन करून मला नेता म्हणाला की, तुम्ही आता 75 वर्षाचे झाले आहेत. त्यावर मी त्यांना पटकन अजून 25 वर्षे शिल्लक आहेत असे उत्तर दिले. मी पाठीमागची वर्षे मोजत नाही. जी राहिली आहेत ती मोजतो, असे मोदी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे उदाहरण देत विद्यार्थ्यांना प्रेरित करत, तुम्ही देखील मागचे मोजण्यात वेळ वाया घालवू नका पुढे काय आहे याचा विचार करा असा सल्ला दिला. पंतप्रधान मोदी यांनी परीक्षा म्हणजे आयुष्य नाही. परीक्षा हे आयुष्य सुधारण्याचे एक साधन आहें, मात्र हे अंतिम नाही. अंतिम लक्ष्य संपूर्ण आयुष्य चांगले करणें हे आहे. 10 वर्षाचे पेपर वाचून जाण्यासारख्या विचारांपुरतेच मर्यादित ठेवू नका, आयुष्यात सर्वोत्तम बनण्याचा प्रयत्न करा असा सल्ला देखील मोदींनी दिला.

# इराण सोडण्याचे अमेरिकेचे नागरिकांना आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : गेल्या काही दिवसांपासून इराणमध्ये तीव्र तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्वोच्च नेते अयातुल्लाह अली खामेनी यांच्या विरोधात नागरिक रस्त्यावर उतरले असून, या आंदोलनांना आता अमेरिका-इराण संघर्षाचे स्वरूप येत असल्याचे चित्र आहे. दोन्ही देशांकडून परस्परांना इशारे आणि थेट धमक्या दिल्या जात असतानाच, अमेरिकेने इराणमधील आपल्या नागरिकांना तात्काळ पश्चिम आशियाई देश सोडण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे अमेरिका इराणवर संभाव्य हल्ला करणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

इराणमधील व्हर्च्युअल अमेरिकन दूतावासाने जारी केलेल्या सूचनेनुसार, अमेरिकन नागरिकांनी इराण तात्काळ सोडावे आणि अमेरिकी सरकारच्या मदतीवर अवलंबून नसलेली बाहेर पडण्याची योजना तयार ठेवावी. इंटरनेट बंद होण्याची शक्यता लक्षात घेऊन पर्यायी संवाद साधनांचा वापर करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तसेच, सुरक्षित असल्यास आर्मेनिया किंवा तुर्कीमार्गे इराणमधून बाहेर पडण्याचा पर्याय विचारात घ्यावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी झालेल्या इराण-इस्रायल संघर्षात अमेरिकेच्या सहभागामुळे तणाव कमालीचा वाढला होता. त्या वेळी अमेरिकेने इराणच्या तीन अणु प्रकल्पांवर हवाई हल्ले करत 'मिडनाईट हॅमर' हे ऑपरेशन राबवले होते.

## 'पुराव्याविना आरोप करणे ही घाणेरडी मानसिकता'

# दमानियांवर कारवाईचा रुपालीताईंचा इशारा!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूवर शंका उपस्थित करत तसेच पार्थ पवार यांच्यावर कथित जमीन घोटाळ्याचे आरोप केल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या वक्तव्यांवर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नेत्या रुपाली चाकणकर यांनी तीव्र संताप व्यक्त करत दमानियांवर कायदेशीर कारवाईचा थेट इशारा दिला आहे.

रुपाली चाकणकर यांनी दमानिया यांच्या पत्रकार परिषदेवर प्रतिक्रिया देताना सांगितले की, आजची पत्रकार परिषद ऐकून समाज किती खालच्या पातळीवर जाऊ शकतो, याचे दर्शन घडले. अंजली दमानिया यांना कपोलकल्पित कथा रचण्याची सवय आहे. त्या सातत्याने एका व्यक्तीला आणि एका कुटुंबाला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. यापूर्वीही दमानिया यांनी अजित पवारांवर अनेक आरोप केले होते; मात्र त्यापैकी एकही आरोप त्या सिद्ध करू शकल्या नाहीत, असे चाकणकर म्हणाल्या. चाकणकर म्हणाल्या की, या कुटुंबाने नुकताच आपला घरातील माणूस गमावला आहे. अशा दुःखाच्या काळात पुराव्याविना संशय निर्माण करणारी विधाने करणे ही अतिशय घाणेरडी आणि असंवेदनशील मानसिकता आहे. केवळ चर्चेत राहण्यासाठी असे आरोप केले जात आहेत. दमानिया यांच्याविरोधात कायदेशीर मार्गाने कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अंजली दमानिया यांनी पार्थ पवार यांना मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात खारगे समितीने 'क्लीन चीट' दिल्याच्या बातम्या फेटाळून लावल्या आहेत. खारगे समितीची अंतिम बैठक अद्याप बाकी असून, कोणतीही क्लीन चीट देण्यात आलेली नाही, असा दावा त्यांनी केला. तसेच पार्थ पवार यांचे नाव एफआयआरमध्ये का नाही, हा प्रश्न उपस्थित करत या प्रकरणातील कागदपत्रे उपलब्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, अंजली दमानिया या महाराष्ट्रातील एक वादग्रस्त पण चर्चेत असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जातात. भ्रष्टाचारविरोधी कार्यकर्ती म्हणून त्यांनी सार्वजनिक आयुष्यात प्रवेश केला. सुरुवातीच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेसविरोधात आक्रमक भूमिका घेत त्यांनी विविध घोटाळ्यांचे आरोप केले आणि माध्यमांमधून मोठी प्रसिद्धी मिळवली. त्यानंतर त्या आम आदमी पक्षाच्या (आप) जवळ गेल्या. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी आपकडून उमेदवारीही लढवली; मात्र अपेक्षित यश मिळाले नाही. आपमधून बाहेर पडल्यानंतर त्यांनी पुन्हा एकदा सत्ताधारी आणि विरोधी पक्षांवर टीका सुरू ठेवली. काही काळ त्या भाजपच्या नेत्यांच्या जवळ असल्याची चर्चा रंगली, तर काही मुद्द्यांवर त्या भाजपवरही कठोर शब्दांत टीका करताना दिसल्या. दमानिया यांचे कामकाज प्रामुख्याने आरोप, कागदपत्रे आणि पत्रकार परिषदांभोवती फिरते. त्या स्वतःला 'व्हिसल ब्लोअर' म्हणवतात; मात्र त्यांच्या आरोपांमागील हेतूंवर अनेकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहे. याच पार्श्वभूमीवर त्यांच्यावर आणि त्यांच्या वक्तव्यांवरून बदनामीचे खटलेही दाखल झाले आहेत. काही प्रकरणांत त्यांनी न्यायालयात माफी मागितल्याचे किंवा विधाने मागे घेतल्याचेही दाखले दिले जातात. एकूणच, अंजली दमानिया यांची कारकीर्द ही भ्रष्टाचारविरोधी लढा,

# लोकसभेचे कामकाज 9 फेब्रुवारीपर्यंत तहकूब

## विरोधकांची जोरदार घोषणाबाजी, अध्यक्षांचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**दिल्ली** : केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 वरील सर्वसाधारण चर्चेला शुक्रवारी सुरुवात होताच लोकसभेत प्रचंड गोंधळ उडाला. विरोधी पक्षांच्या जोरदार घोषणाबाजीमुळे काही मिनिटांतच लोकसभेचे कामकाज सोमवार (दि.9) सकाळी 11 वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. सकाळी 11 वाजता लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधी पक्षांच्या खासदारांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू केली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शांतता राखण्याचे आवाहन केले. मात्र, विरोधकांनी गोंधळ सुरूच ठेवल्याने अवघ्या पाच मिनिटांतच लोकसभेचं कामकाज दुपारी 12 वाजेपर्यंत तहकूब केले. दुपारी पुन्हा सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यानंतरही विरोधकांकडून जोरदार घोषणाबाजी सुरु होती. विरोधी पक्षाच्या खासदारांनी सभागृहात फलक दाखवत सरकारवर टीका केली. यावेळी लोकसभेच्या अध्यक्षस्थानी कृष्णकुमार टेनेटी होते. त्यांनी विरोधी पक्षाने दिलेले तहकूब प्रस्ताव अध्यक्षांनी फेटाळल्याचे सांगत कामकाज पुढे नेण्याचा प्रयत्न केला. केंद्रीय मंत्री जेपी नड्डा यांच्यासह काही मंत्र्यांनी आपल्या नावावरील कागदपत्रे सभागृहात सादर करण्यास सुरुवात केली. परंतु त्याचवेळी विरोधी पक्षातील खासदारांनी अध्यक्षांच्या आसनाजवळ येत जोरदार घोषणाबाजी सुरु केली. त्यामुळे अध्यक्षांनी लोकसभेचे कामकाज सोमवार सकाळी 11 वाजेपर्यंत तहकूब केले. संसद भवनाच्या मकर द्वाराजवळही विरोधकांनी शुक्रवारी आंदोलन केले. भारत-अमेरिका व्यापार कराराच्या निषेधार्थ विरोधी खासदारांनी हा करार सापळा असल्याचा आरोप करत फलक दाखवले. यावेळी जो उच्चीत समझो वही करो, तानाशाही नही चलेगी अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. या आंदोलनात काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनीही सहभाग घेतला. यापूर्वीही संसदेत गदारोळ झाला होता.

### दीपक मडावी यांना चकमकीत वीरमरण

**गडचिरोली** : छत्तीसगड सीमेलगतच्या भामरागड उपविभागातील अबुझमाड जंगल परिसरात पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये भीषण चकमक झाली. यामध्ये आतापर्यंत तीन नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे. ही कारवाई करताना नक्षलवाद्यांशी लढतेवेळी सी-६० पथकाचे जवान दीपक चिन्ना मडावी यांना वीरमरण आले, तर अन्य एक जवान जखमी झाला असल्याची माहिती समोर येत आहे. ३ फेब्रुवारीच्या संध्याकाळी नक्षलवाद्यांच्या 'कंपनी क्रमांक १०' आणि छत्तीसगडमधील एका दलमची हालचाल असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर गडचिरोली पोलिसांनी ही मोहीम हाती घेतली होती.

# स्थायी समिती अध्यक्षपदासाठी चुरस

## पुण्याच्या तिजोरीच्या चाव्या कुणाकडे याकडे लक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : पुणे महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने ११९ जागांवर दणदणीत विजय मिळवत एकहाती सत्ता प्रस्थापित केली असून विरोधकांना धोबीपछाड दिली आहे. स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर पालिकेतील सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. महापौर, उपमहापौर आणि सभागृह नेत्यांची नावे जवळपास निश्चित झाल्यानंतर आता महापालिकेचा आर्थिक कणा मानल्या जाणाऱ्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदाकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

भाजपने महापौरपदाची जबाबदारी मंजुषा नागपुरे यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय घेतला असून, उपमहापौरपदी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे परशुराम वाडेकर यांची निवड जवळपास निश्चित मानली जात आहे. तर सभागृह नेते म्हणून गणेश बिडकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे. प्रमुख पदांचे वाटप झाल्यानंतर आता स्थायी समितीसह अन्य महत्त्वाच्या समित्यांच्या अध्यक्षपदांसाठी पक्षांतर्गत हालचालींना वेग आला आहे.

महापालिकेच्या अर्थकारणावर नियंत्रण ठेवणारी स्थायी समिती ही राजकीयदृष्ट्या अत्यंत प्रभावी मानली जाते.

विकासकामांसाठी निधी मंजुरी, धोरणात्मक निर्णय आणि आर्थिक नियोजन या सर्व बाबी या समितीच्या अखत्यारीत येतात. त्यामुळे या पदासाठी भाजपमध्ये जोरदार चुरस निर्माण झाली आहे. सध्या श्रीनाथ भिमाले आणि बॉबी ऊर्फ अनिल टिंगरे ही दोन नावे आघाडीवर असून, गेल्या टर्ममध्ये इच्छुक असलेले आबा शिळीमकर यांचे नावही चर्चेत आहे.

अंतिम निर्णय कोणाच्या बाजूने लागणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. गेल्या चार वर्षांपासून पुणे महापालिकेवर प्रशासक राजवट असल्याने लोकप्रतिनिधींचा थेट सहभाग नव्हता. आता स्पष्ट बहुमतासह सत्तेत आलेल्या भाजपसमोर पुणेकरांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे मोठे आव्हान आहे.

# महापौरपदी रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर बिनविरोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड** : पिंपरी-चिंचवड शहराच्या सत्तावीसाव्या महापौरपदी भाजपचे रवि लांडगे यांची आज (शुक्रवारी) बिनविरोध निवड झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने महापौरपदासाठी अर्ज दाखल केला नव्हता. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी लांडगे यांची महापौरपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वैशाली काळभोर यांनी उपमहापौरपदासाठी भरलेला अर्ज मागे घेतला. त्यामुळे उपहापौरपदी भाजपच्या शर्मिला बाबर यांचीही बिनविरोध निवड झाली.

महापौर, उपमहापौरपदासाठी सोमवारी (२ फेब्रुवारी) उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. भाजपकडून प्रभाग ६ धावडेवस्तीमधून दुसऱ्यांदा बिनविरोध निवडून आलेल्या रवि लांडगे यांनी अर्ज दाखल केला होता. त्यांचा एकमेव अर्ज होता. त्यामुळे त्यांची निवड निश्चित होती. उपमहापौरपदासाठी निगडी, प्राधिकरणाचे प्रतिनिधित्व करीत असलेल्या भाजपच्या शर्मीला बाबर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला होता. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने केवळ उपमहापौरपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आकुर्डीचे प्रतिनिधित्व करीत असलेल्या वैशाली काळभोर यांनी उपमहापौरपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. महापाहापौर-उपमहापौरपदासाठी आज शुक्रवारी (६ फेब्रुवारी) निवडणूक प्रक्रिया झाली. सकाळी ११ वाजता नवनिर्वाचित नगरसेवकांची सभा पार पडली. महापौरपदासाठी रवि यांचा एकमेव अर्ज असल्याने निवडणूक निर्णय अधिकारी असलेले सहकार आयुक्त दिपक तावरे यांनी रवि यांची महापौरपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. त्यानंतर उपमहापौरपदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वैशाली काळभोर यांनी माघारीच्या मुदतीत माघार घेतली. त्यामुळे भाजपच्या बाबर यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. रवि लांडगे २७ वे महापौर तर शर्मिला बाबर याही २७ व्या उपमहापौर झाल्या आहेत.भोसरीतील ज्ञानेश्वर लांडगे हे महापालिकेचे पहिले महापौर झाले होते. त्यांनी २७ मार्च १९८६ ते १९ मार्च १९८७ असे वर्षभर महापौरपद भूषवले. ते काँग्रेसकडून निवडून आले होते.



**पिंपरी-चिंचवड** : शहराच्या सत्तावीसाव्या महापौरपदी भाजपचे रवि लांडगे यांची तर तर शर्मिला बाबर उपमहापौरपदी शुक्रवारी बिनविरोध निवड झाली आहे. या प्रसंगी त्यांना आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आ. अमित गोरखे, आ. उमाताई खापरे, भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, राजू मिसाळ आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने प्रामुख्याने उपस्थित होते.

## संपादकीय

# संसदेतील गदारोळ आणि लोकशाहीची कसोटी



**लोकसभेत पंतप्रधानांच्या उपस्थितीबाबत अध्यक्षांनी घेतलेला अपवादात्मक निर्णय आणि त्याभोवती उभे राहिलेले आरोप–प्रत्यारोप हे केवळ राजकीय वाद नाहीत. ते संसदीय शिस्त, संस्थात्मक विश्वास आणि लोकशाही संस्कृतीच्या सध्याच्या अवस्थेवर प्रकाश टाकणारे आहेत.**

लोकसभा हे केवळ कायदे करण्याचे व्यासपीठ नाही; ती लोकशाहीच्या व्यवहाराची सर्वात दृश्यमान आणि प्रतीकात्मक जागा आहे. त्यामुळेच तिथे घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे पडसाद सभागृहाबाहेरही उमटतात. पंतप्रधानांच्या भाषणावेळी संभाव्य गोंधळाच्या कारणास्तव त्यांना सभागृहात येऊ न देण्याचा निर्णय घेतल्याचा लोकसभा अध्यक्षांचा दावा हा त्याच कारणासाठी अस्वस्थ करणारा ठरतो. कारण यात प्रश्न एका पक्षाचा किंवा एका दिवशीचा राहत नाही; तो संसदेच्या कार्यपद्धतीचा आणि राजकीय संस्कृतीचा बनतो. अध्यक्षांनी दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, काही विरोधी सदस्यांकडून "अनपेक्षित घटना" घडू शकते, अशी माहिती होती. ही माहिती नेमकी कोणती, किती विश्वासार्ह आणि कुणाकडून आली, हे तपशील सभागृहासमोर आलेले नाहीत. संसदीय लोकशाहीत अशी अपारदर्शकता धोक्याची असते. अध्यक्ष हे सत्ताधारी वा विरोधक यांच्यापैकी कुणाचेही प्रतिनिधी नसतात; ते संपूर्ण सभागृहाचे संरक्षक असतात. त्यामुळे त्यांच्या निर्णयांवर विश्वास ठेवला जातो. पण तो विश्वास टिकवण्यासाठी निर्णयांची कारणेही तितकीच स्पष्ट असावी लागतात. पंतप्रधानांचे उत्तर देणे ही संसदीय परंपरेतील महत्त्वाची प्रक्रिया आहे. सरकारच्या कामकाजावर विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना थेट उत्तर देण्याची ही संधी असते. ती टाळली गेली, तर लोकशाहीतील उत्तरदायित्वाची साखळी तुटते. विरोधकांचा आक्षेप याच मुद्द्यावर केंद्रित आहे. त्यांच्या मते, शिस्तीच्या नावाखाली सरकारने अस्वस्थ प्रश्नांना सामोरे जाणे टाळले. हा आरोप फेटाळताना सरकार आणि अध्यक्षांनी सुरक्षेचा मुद्दा पुढे केला आहे. येथेच प्रश्न उभा राहतो: संसदेमध्ये शिस्त आणि सुरक्षा यांचा तोल कसा राखायचा? विरोध करणे, घोषणाबाजी करणे, सभात्याग करणे हे संसदीय राजकारणाचे जुने मार्ग आहेत. ते अनुचित वाटू शकतात, पण ते लोकशाहीच्या चौकटीत येतात. मात्र जर विरोध हिंसक वळण घेण्याची शक्यता असेल, तर ती गंभीर बाब ठरते. अशा वेळी कठोर पावले उचलावी लागतात. पण ती पावले संशयाच्या आधारावर नव्हे, तर ठोस आणि स्पष्ट कारणांवर आधारित असावीत. या प्रकरणात सत्ताधारी आणि विरोधक दोघांचीही जबाबदारी आहे. विरोधकांनी संसदेच्या गरिमेला धक्का पोहोचेल, असे वर्तन करण्याचा विचारही करणे चुकीचे आहे. त्याच वेळी, सत्ताधाऱ्यांनीही संसदीय प्रक्रियेपासून पळ काढल्याचा आभास निर्माण होईल, असे निर्णय टाळायला हवेत. लोकसभा ही सत्तेचे प्रदर्शन करण्याची जागा नसून, वादातून मार्ग काढण्याचे व्यासपीठ आहे. अध्यक्षांच्या भूमिकेकडेही अधिक गांभीर्याने पाहावे लागेल. अध्यक्षपद हे संविधानिक पद आहे. त्यावर बसलेली व्यक्ती राजकीय पक्षांपलीकडे उभी राहील, ही अपेक्षा असते. अध्यक्षांच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित होणे हेच संस्थात्मक आरोग्याचे लक्षण मानले जाते. पण त्याची उत्तरेही तितक्याच संयमाने आणि स्पष्टपणे दिली गेली पाहिजेत. अन्यथा अध्यक्षपदही वादाच्या भोवऱ्यात अडकते. या घटनेने आणखी एक वास्तव उघड केले आहे: संसदेतील संवादाचा ऱ्हास. चर्चेऐवजी घोषणाबाजी, प्रश्नांऐवजी आरोप आणि उत्तरांऐवजी स्पष्टीकरणे हा प्रवास लोकशाहीसाठी हितकारक नाही. संसदेतील गदारोळाचा फायदा कुणालाच होत नाही; नुकसान मात्र संस्थांचे होते. नागरिकांचा संसदेकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिकच संशयी बनतो. लोकशाही ही नियमांनी जितकी चालते, तितकीच ती संकेतांवर आणि परंपरांवरही टिकून असते. पंतप्रधानांचे भाषण, विरोधकांचा विरोध, अध्यक्षांची मध्यस्थी हे सारे त्या परंपरेचे भाग आहेत. त्यात एखादा दुवा कमकुवत झाला, तर संपूर्ण साखळी ताणली जाते. सध्या ती ताणली जात असल्याचीच चिन्हे दिसतात. या पार्श्वभूमीवर, या घटनेचे राजकीय भांडवल करण्यात अर्थ नाही. त्याऐवजी आत्मपरीक्षणाची गरज आहे. विरोधकांनी आपली भूमिका अधिक जबाबदारीने मांडण्याची, तर सत्ताधाऱ्यांनी प्रश्नांना सामोरे जाण्याची तयारी दाखवण्याची गरज आहे. अध्यक्षांनीही पारदर्शकतेचा निकष उंचावला पाहिजे. संसद ही लोकशाहीची प्रयोगशाळा आहे. तिथे मतभेद असणारच, संघर्षही असणार. पण त्या संघर्षाला दिशा देणारी शिस्त, संयम आणि परस्पर सन्मान हरवला, तर लोकशाहीचा गाभाच कोरडा होतो. सध्याच्या घटनेतून धडा घेतला गेला, तर ती संधी ठरू शकते; अन्यथा तिची आणखी एका गदारोळात नोंद होईल.

# मोबाईलच्या स्क्रीनवर अडकलेले बालपण!

**» गाझियाबादमधील तीन अल्पवयीन बहिणींच्या आत्महत्येने किशोरवयीन आयुष्याची अस्वस्थ बाजू उघडी पाडली आहे. आर्थिक ताण, कौटुंबिक दुरावा आणि डिजिटल विश्वातील अतिविसर्जन यांचा संगम आजच्या बालपणाला एकाकी, नाजूक आणि धोकादायक बनवत आहे.**



गाझियाबादमधील तीन अल्पवयीन बहिणींच्या आत्महत्येने देश हादरला, असे म्हणणे पुरेसे ठरणार नाही. ही घटना धक्कादायक आहे, पण दुर्दैवाने ती अनपेक्षित नाही. कारण या शोकांतिकेमध्ये जे दिसते, ते अपवादात्मक नसून आजच्या किशोरवयीन अनुभवाचे टोकाचे रूप आहे. आर्थिक अस्थिरता, कौटुंबिक विस्कळीतपणा आणि डिजिटल जगात खोलवर बुडालेली मुले – या तीन घटकांचा घातक संगम आता अधिक ठळकपणे समोर येत आहे. या तीन बहिणींच्या मृत्यूमागील तपशील पाहिला, तर कुठेही एका क्षणात घडलेली दुर्घटना दिसत नाही. उलट, तुकड्या-तुकड्यांत विखुरलेली एक विवंचनात्मक कथा दिसते. कोविडनंतर शाळा सुटणे, घरातील आर्थिक ताण, पालकांशी संवादाचा अभाव आणि हळूहळू प्रत्यक्ष जगापासून दूर जाऊन ऑनलाइन मनोरंजनाच्या विश्वात आश्रय शोधणे असा हा प्रवास अनेक कुटुंबांना परिचित वाटेल. फरक इतकाच की या प्रकरणात त्या आश्रयाचा शेवट मृत्यूत झाला. कोरियन नाटके आणि ऑनलाइन गेम्स या मुलींच्या चिठ्ठीत आमचे जीवन म्हणून येतात, हे विशेष लक्षवेधी आहे. मनोरंजनाच्या साधनाला जीवनाचा पर्याय मानण्यापर्यंतची मानसिक अवस्था एका रात्रीत तयार होत नाही. ती हळूहळू घडते. जेव्हा घरात ऐकून घेतले जात नाही, शाळा तुटते, मित्रपरिवार विरळ होतो आणि भविष्य अनिश्चित वाटते, तेव्हा पडदा एकाच वेळी आधार आणि पळवाट ठरतो. पण हा पडदा बेबीसिटरही ठरतो आणि रणांगणही. आजची पहिली खरी डिजिटल नेटिव्ह पिढी अशा जगात वाढते आहे जिथे ऑनलाइन आणि ऑफलाइन यामधील सीमारेषा पुसट झाली आहे. पालक आणि शिक्षक मात्र अजूनही या संस्कृतीबाहेर उभे आहेत. मुलांचे आयुष्य ज्या प्लॅटफॉर्मवर आकार घेत आहे, त्याची भाषा, संकेत, दडपणं आणि आकर्षण यांची पुरेशी जाण प्रौढांकडे नाही. त्यामुळे देखरेख केवळ कठीणच नाही, तर अनेकदा चुकीच्या पद्धतीची होते, उपदेशात्मक, नियंत्रणवादी किंवा उशिरा दिलेली. जागतिक आकडेवारीही अस्वस्थ करणारी आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, १० ते १९ वयोगटातील सातपैकी एक मूल मानसिक विकाराने ग्रस्त आहे. भारतात चारपैकी एक किशोरवयीन चिंता किंवा नैराश्याची लक्षणे नोंदवतो. राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या आकडेवारीनुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. ही आकडेवारी केवळ मानसिक आरोग्याच्या सेवांचा अभाव दाखवत नाही, तर सामाजिक संरचनेतील ताणतणावही अधोरेखित करते. सोशल मीडिया आणि ऑनलाइन गेमिंगबाबतची अस्वस्थता आता धोरणांच्या पातळीवर पोहोचू लागली आहे. ऑस्ट्रेलियाने सोशल मीडिया वापरासाठी किमान वयाची मर्यादा कायदेशीर केली आहे. युरोपमध्ये अल्पवयीनांसाठी संरक्षणात्मक नियम अधिक कडक झाले आहेत. भारतातही अशा चर्चांना वेग आला आहे. परंतु केवळ वयमर्यादा किंवा ॲप्सवर बंदी घालून प्रश्न सुटणार नाही, हे स्पष्ट आहे. कारण समस्या केवळ 'काय पाहतात' याची नाही, तर 'का पाहतात' याची आहे. मुलं पडद्याकडे वळतात कारण वास्तव जगात त्यांना आधार कमी वाटतो. शाळा केवळ अभ्यासक्रमापुरती मर्यादित झाली आहे; समुपदेशन, भावनिक शिक्षण आणि सुरक्षित संवादाच्या जागा दुय्यम ठरल्या आहेत. कुटुंबे आर्थिक ताणात सापडलेली आहेत; पालकांकडे वेळ कमी आहे, संयम कमी आहे. अशा वेळी ऑनलाइन जग झटपट ओळख, मान्यता आणि पलायन देते. पण ते एकाकीपण अधिक खोल करते. गाझियाबादच्या बहिणींच्या चिठ्ठीत दिसणारी भाषा ही बंडखोरीची नाही, तर असहायतेची आहे. "आमचे जीवन सोडायला भाग पाडण्याची तुमची हिंमत कशी झाली?" हा प्रश्न पालकांना, शाळांना आणि समाजालाच विचारलेला आहे. हा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. कारण तो केवळ तीन मुलींचा नाही, तर संपूर्ण पिढीचा प्रश्न आहे. यातून बाहेर पडण्यासाठी संयमाने आणि संवेदनशीलतेने संपर्क साधण्याची गरज आहे. मुलांना 'काय चुकीचे आहे' हे सांगण्यापेक्षा 'तुला काय वाटते' हे विचारण्याची संस्कृती तयार करावी लागेल. शाळा, पालक आणि धोरणकर्ते यांना एकत्र येऊन सुरक्षित, ऐकून घेणाऱ्या जागा निर्माण कराव्या लागतील. डिजिटल जग टाळता येणार नाही; पण त्यामध्ये एकटे पडू न देण्याची जबाबदारी समाजाची आहे. गाझियाबादची घटना शोकांतिका आहे, पण ती इशाराही आहे. तो इशारा दुर्लक्षित केला, तर पुढच्या वेळी बातमी फक्त शहर बदललेले

# थेरगाव, जिजामाता व नेहरूनगर आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र

## एनक्यूएएस मानांकन मिळवणारी पिंपरी-चिंचवड महाराष्ट्रातील पहिली महापालिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या थेरगाव, जिजामाता आणि नेहरूनगर या तीन शहरी प्राथमिक आरोग्य सुविधा केंद्रांना भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाकडून राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानकांनुसार (एनक्यूएएस) राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. हे मानांकन मिळवणारी पिंपरी-चिंचवड महापालिका ही महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरली असून, शहराच्या आरोग्य सेवांसाठी हा अत्यंत गौरवाचा क्षण मानला जात आहे.

या राष्ट्रीय प्रमाणपत्रामुळे महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने दिलेल्या गुणवत्तापूर्ण, सुरक्षित आणि रुग्ण-केंद्रित सेवांची देशपातळीवर दखल घेतली गेली आहे. नागरिकांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांची विश्वासार्हता, पारदर्शकता आणि कार्यक्षमता या मानांकनामुळे अधिक भक्कम झाली आहे. राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन (एनक्यूएएस) हे संक्रमण नियंत्रण, क्लिनिकल केअर, रुग्ण हक्क, रुग्णालय व्यवस्थापन, स्वच्छता, बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट आणि सेवा सुधारणा अशा महत्त्वपूर्ण निकषांवर आधारित असते. या सर्व निकषांची काटेकोर पूर्तता करत थेरगाव, जिजामाता व नेहरूनगर येथील आरोग्य केंद्रांनी उच्च दर्जाच्या आरोग्य सेवांचे उदाहरण घालून दिले आहे. महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर आणि अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे यश साध्य करण्यात आले. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अंजली ढोणे, डॉ. किशोरी नलवडे, शहर गुणवत्ता आश्वासन समन्वयक डॉ. कोमल बनसोडे तसेच संबंधित आरोग्य केंद्रातील संपूर्ण वैद्यकीय व प्रशासकीय टीमने सातत्यपूर्ण मेहनत घेतली. डॉ. छाया शिंदे व डॉ. शैलजा भावसार यांचेही या प्रक्रियेत मोलाचे सहकार्य लाभले. महापालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये जागतिक आरोग्य संघटना (डब्ल्यूएचओ) व भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्वच्छता, निर्जंतुकीकरण, ओपीडी व्यवस्थापन आणि सुरक्षित उपचार वातावरण राखले जाते.

# शेअर ट्रेडिंगच्या आमिषाने पुण्यात सव्वाकोटींची फसवणूक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : ऑनलाइन शेअर ट्रेडिंगमध्ये अल्पावधीत मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत सायबर चोरट्यांनी पुण्यातील तिघांची तब्बल सव्वा कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर पोलिस ठाणे, मार्केट यार्ड आणि वाघोली पोलिस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सायबर पोलिस ठाण्यात दाखल प्रकरणात लोहगाव परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीकडून व्हॉट्सॲप ग्रुपच्या माध्यमातून शेअर ट्रेडिंगमधील नफ्याचे आमिष दाखवत ५० लाख रुपये उकळण्यात आले. आरोपींनी एक ॲप डाउनलोड करण्यास सांगून वेगवेगळ्या बँक खात्यांत पैसे भरण्यास भाग पाडले. मात्र, कोणतीही गुंतवणूक किंवा परतावा न देता फसवणूक करण्यात आली.

मार्केट यार्ड पोलिस ठाण्याच्या हद्दीत बिबवेवाडी येथील ४७ वर्षीय व्यक्तीची ४२ लाख ६६ हजार रुपयांची, तर वाघोली पोलिस ठाण्याच्या हद्दीत केसनंद येथील ३४ वर्षीय तरुणाची २६ लाख ५५ हजार रुपयांची फसवणूक झाली आहे. यूपीआय व आरटीजीएसद्वारे रक्कम वर्ग करून घेत आरोपींनी कोणताही परतावा दिला नाही.

तिन्ही प्रकरणांत पोलिसांकडून सखोल तपास सुरू असून, नागरिकांनी अनोळखी व्हॉट्सॲप ग्रुप, संशयास्पद लिंक व ॲप्सपासून सावध राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# चिंचवड देवस्थानला 'ब' दर्जा पर्यटन क्षेत्राचा दर्जा मिळवण्यासाठी प्रयत्न करणार

## आमदार शंकर जगताप यांची ग्वाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड** : चिंचवड देवस्थान ट्रस्टने सामाजिक बांधिलकी जपत सेवा कार्याला धार्मिक अनुष्ठानाची जोड देत समाजात आदर्श निर्माण केला आहे. आरोग्य, स्वच्छता आणि विविध सामाजिक उपक्रमांतून मानवतावादी दृष्टिकोन जपणाऱ्या या देवस्थानचे कार्य महाराष्ट्राच्या बाहेरही पोहोचावे, यासाठी देवस्थानला 'ब' दर्जा पर्यटन क्षेत्राचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही आमदार शंकर जगताप यांनी दिली. भविष्यात अधिकाधिक निधी उपलब्ध करून देत भाविकांना चांगल्या सुविधा देण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

'क' दर्जा पर्यटन विशेष निधीतून श्रीमन् महासाधू श्री मोरया गोसावी मंदिर परिसर सुशोभीकरण कामाचा भूमिपूजन सोहळा गुरुवारी चिंचवड येथे पार पडला. या वेळी माजी महापौर अपर्णा डोके, नगरसेवक सुरेश भोईर, अनंत कोऱ्हाळे, नगरसेविका मनीषा चिंचवडे, आशा सूर्यवंशी, मुख्य विश्वस्त मंदार महाराज देव, विश्वस्त जितेंद्र महाराज देव यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार जगताप म्हणाले की, चिंचवडचे श्री मोरया गोसावी हे गाणपत्य संप्रदायाचे आद्यपीठ असून महाराष्ट्रातील एक अत्यंत पवित्र देवस्थान आहे. २०२२ मध्ये या देवस्थानला 'क' दर्जा पर्यटन क्षेत्राचा दर्जा मिळाला आहे.

# देवदूत ठरले लष्करी अधिकारी; वानवडीत अपघातग्रस्ताचे प्राण वाचवले

## लाखो रुपयांची रोकडही परत केली; पुणेकरांसमोर माणुसकीचा आदर्श

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : संकटसमयी लष्करी जवान केवळ देशाच्या सीमेवरच नव्हे, तर सामान्य नागरिकांसाठीही देवदूत ठरतात, याचा प्रत्यय पुणेकरांना पुन्हा एकदा आला. वानवडी परिसरात घडलेल्या एका भीषण अपघातात लष्करी अधिकारी आशिष कुमार यादव यांनी प्रसंगावधान दाखवत अपघातग्रस्त कार चालकाचे प्राण वाचवलेच, शिवाय त्याच्याकडील लाखो रुपयांची रोकड प्रामाणिकपणे परत करत माणुसकीचा आदर्श घालून दिला.

**भरधाव कार नाल्यात कोसळली**

वानवडीतील गंगा सॅटेलाईट सोसायटीजवळील भैरोबा नाल्याच्या पुलावर आज सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. एका चारचाकी वाहनावरील चालकाचा ताबा सुटल्याने कार थेट पुलावरून खाली नाल्यात कोसळली. अपघात इतका भीषण होता की वाहनाचा अक्षरशः चक्काचूर झाला आणि चालक गाडीतच अडकून बेशुद्ध पडला.

याच मार्गावरून योगायोगाने जात असलेले लष्करी अधिकारी नायर आशिष कुमार यादव यांनी पुलावर जमलेली गर्दी पाहून आपले वाहन थांबवले. नाल्यात पडलेली कार आणि त्यातील हालचाल दिसताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता जीव धोक्यात घालून नाल्यात उडी घेतली. स्थानिकांच्या मदतीने कारची काच फोडून त्यांनी चालकाला बाहेर काढले.

**प्रामाणिकपणाचाही आदर्श**

जखमी चालकाच्या नाकातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत होता. यादव यांनी आपल्या लष्करी प्रशिक्षणाचा उपयोग करत स्वतःच्या रुमालाने जखमेवर दाब देत प्राथमिक उपचार केले. अपघातग्रस्त कारमध्ये १ ते १.५ लाख रुपयांची रोकड असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. गोंधळाच्या वातावरणात ही रक्कम गहाळ होऊ शकली असती, मात्र यादव यांनी ती सुरक्षित ठेवून चालक शुद्धीवर आल्यानंतर प्रामाणिकपणे परत केली. त्यानंतर जखमीला टेम्पोच्या साहाय्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेनंतर यादव यांच्या धाडसाचे आणि प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कात्रज–कोंढवा रस्ता अंतिम टप्प्यात; १५ दिवसांत भूसंपादन पूर्ण, मार्चपासून कामाला सुरुवात

## ७१० कोटींचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प, शहरातील वाहतूक कोंडीवर मोठा उपाय ठरणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : कात्रज ते कोंढवा या महत्त्वाच्या मार्गाच्या रुंदीकरणाचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, ५० मीटर रुंदीच्या कात्रज–कोंढवा रस्त्याचे भूसंपादन येत्या १५ दिवसांत पूर्ण होणार आहे. त्यानंतर १५ मार्चपासून प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात होईल, अशी माहिती महापालिका आयुक्त नवलकिशोर राम आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. शहर परिवर्तन कक्षाच्या बैठकीनंतर त्यांनी ही माहिती माध्यमांना दिली.

राजस सोसायटी, कात्रज ते खडी मशिन चौक, कोंढवा या दरम्यानचा हा रस्ता सुमारे ७१० कोटी रुपये खर्चाचा असून, पुणे शहराच्या दक्षिण भागातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तो अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. सुरुवातीला हा रस्ता ८४ मीटर रुंदीचा प्रस्तावित होता. मात्र, मोठ्या प्रमाणावर भूसंपादन अडचणीत सापडल्याने आणि नागरिकांच्या हरकतींमुळे अखेर ५० मीटर रुंदीचा तडजोडीचा निर्णय घेण्यात आला.

या रस्त्याच्या कामाला ऑक्टोबर २०१८ मध्ये मान्यता मिळाली होती. मात्र, गेली अनेक वर्षे भूसंपादन रखडल्यामुळे प्रत्यक्ष काम सुरू होऊ शकले नव्हते. आता भूसंपादन अंतिम टप्प्यात आल्याने प्रकल्पाला गती मिळणार आहे. हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर कात्रज, कोंढवा, यवलेवाडी, निब्म, हडपसरकडे जाणारी वाहतूक अधिक सुरळीत होणार आहे.

दरम्यान, शहरातील ३० 'मिसिंग लिंक' रस्त्यांपैकी १२ रस्ते येत्या एका वर्षात पूर्ण करण्याचा महापालिकेचा मानस आहे. यासाठी भूसंपादनाचा प्रश्न प्राधान्याने सोडवण्यात येणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सहकार्याने ही प्रक्रिया वेगाने पूर्ण केली जाईल, असे आयुक्त राम यांनी स्पष्ट केले. याच बैठकीत शहरातील ओव्हरहेड केबल्सचा प्रश्नही चर्चेला आला. इंटरनेट, केबल आणि डीटीएच कंपन्यांकडून बेकायदेशीरपणे टाकलेल्या केबल्समुळे अपघाताचा धोका वाढला असून, शहराचे विद्रूपही झाले आहे. यावर तोडगा काढण्यासाठी पुढील महिन्यात 'ओव्हरहेड केबल धोरण' निश्चित करण्यात येणार असून, सर्वेक्षणानंतर कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

### दीर्घकालीन पर्यायासाठी निर्णयाची गरज

● पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर 'शिरूर–चाकण–तळेगाव–कर्जत–उरण (जेएनपीटी) मल्टिमोडल कॉरिडॉर' या पर्यायी मार्गाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. ऑक्टोबर २०२५ मध्ये या मार्गाचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर मांडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, अद्याप हा प्रकल्प कागदावरच अडकलेला असून, प्रत्यक्ष अंमलबजावणीची चिन्हे दिसत नाहीत. एकीकडे कात्रज–कोंढवा रस्त्याने शहरांतर्गत वाहतुकीला दिलासा मिळण्याची आशा निर्माण झाली असली, तरी पुणे–मुंबईदरम्यानच्या दीर्घकालीन पर्यायासाठी ठोस निर्णयाची गरज अधिक तीव्र होत चालली आहे.

# पंतप्रधानांकडून पुण्यातील महेश नामपूरकर यांच्या कार्याची प्रशंसा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : पुण्यातील सुप्रसिद्ध वास्तुविशारद महेश नामपूरकर यांच्या वास्तुकला आणि भूदृश्यकला (लँडस्केप) क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतली आहे. पंतप्रधानांनी नामपूरकर यांना प्रशंसापत्र पाठवत त्यांच्या समाजोपयोगी, शाश्वत आणि पर्यावरणपूरक वास्तुसंकल्पनांचे विशेष कौतुक केले आहे. हा सन्मान पुणे आणि महाराष्ट्रातील वास्तुविशारद समुदायासाठी अभिमानास्पद मानला जात आहे.

पंतप्रधान मोदी यांनी पत्रात नमूद केले आहे की, राष्ट्रउभारणीत नामपूरकर यांनी दिलेले योगदान आणि जागतिक पातळीवर निर्माण केलेली ओळख उल्लेखनीय आहे. वास्तुकला व भूदृश्यकला क्षेत्रातील त्यांचे कार्य दूरदृष्टीचे असून, त्याचा देशातील तरुण पिढीवर सकारात्मक प्रभाव पडत आहे. भारतीय कलाकार आणि शिल्पकारांना प्रोत्साहन देत देशाला हरित बनविण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान महत्त्वाचे असल्याचेही पत्रात अधोरेखित करण्यात आले आहे. त्यांच्या पुढील सर्जनशील वाटचालीस शुभेच्छा देत भविष्यातही असेच कार्य सुरू राहील, अशी अपेक्षा पंतप्रधानांनी व्यक्त केली आहे. या सन्मानाबाबत प्रतिक्रिया देताना महेश नामपूरकर म्हणाले की, देशाच्या सर्वोच्च पदावरून मिळालेला हा गौरव केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण महाराष्ट्रातील वास्तुविशारद समुदायासाठी अभिमानास्पद आहे. वास्तुकलेच्या माध्यमातून राष्ट्रसेवेला नवे बळ देण्याची प्रेरणा या पत्रामुळे मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### निसर्गराजा मित्र जिवांचे संस्थेकडून लॅपटॉप वितरण

**ओतूर :** निसर्गराजा मित्र जिवांचे - पुणे या सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात कार्यरत संस्थेच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ओतूर नं. १ येथे वाचनालयाची स्थापना करण्यात आली. शाळेसाठी पुस्तकांचे कपाट व शेकडो पुस्तके देण्यात आली. तसेच टॅम टॅम इंडिया प्रा. लि.च्या सहकार्याने डेल कंपनीचा लॅपटॉपही वितरित करण्यात आला. संस्थेचे संस्थापकीय संचालक राहुल घोलप यांच्या हस्ते साहित्य वितरण झाले. या उपक्रमाचे शिक्षक, शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी कौतुक केले.

### वांग्याच्या उत्पादनातून १० लाखांचा विक्रमी नफा

**भोर :** भोर तालुक्यातील न्हावी (सर्वे नं. १५) येथील शेतकरी राजेंद्र महादेव सोनवणे यांनी एक एकर क्षेत्रात काळ्या वांग्याचे (भरीत वांगे) विक्रमी ३० टन उत्पादन घेत तब्बल १० लाख रुपयांचा नफा कमावला आहे. इंडाम कंपनीच्या 'बारटोक' जातीच्या बियाण्याचा वापर करून ऑक्टोबर ते जानेवारीदरम्यान १६ तोडे झाले आहेत. मार्चपर्यंत तोड सुरू राहणार असून कुटुंबाच्या मेहनतीतून हे यश मिळाले आहे.

### टाव्हरेवाडीच्या टाव्हरे बंधूंच्या कालवडींना राज्यात मानांकन

**पारगाव :** टाव्हरेवाडी (ता. आंबेगाव) येथील गणेश व योगेश टाव्हरे या बंधूंनी आधुनिक दुग्धव्यवसायातून यश मिळवले आहे. बारामती येथे झालेल्या कृषिक २०२६ प्रदर्शनात त्यांच्या गोठ्यातील होलस्टीन फ्रिजियन जातीच्या दोन कालवडींनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. केवळ दहावीपर्यंत शिक्षण असूनही आधुनिक तंत्रज्ञान, भ्रूण प्रत्यारोपण व मेहनतीच्या जोरावर दररोज सुमारे ५०० लिटर दूध उत्पादन घेत महिन्याला अडीच ते तीन लाखांचे निव्वळ उत्पन्न ते मिळवत आहेत.

### २३९ मतदान केंद्रांसाठी ईव्हीएम व साहित्याचे वितरण; ७ फेब्रुवारीला मतदान

# आंबेगाव तालुक्यात निवडणुकीची तयारी पूर्ण!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद - पुणे व पंचायत समिती निवडणुकांसाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असून, २३९ मतदान केंद्रांवरील मतदान पथकांना ईव्हीएम व मतदान साहित्याचे वितरण शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी येथे पार पडले. ही माहिती निवडणूक विभागाने दिली.

निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबविण्यात आली. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सतीश थेटे, तहसीलदार डॉ. सचिन वाघ, अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना कोल्हे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व मतदान पथके दुपारी सुमारे १२.३० वाजेपर्यंत वितरण केंद्रातून आपल्या-आपल्या नेमून दिलेल्या मतदान केंद्रांकडे रवाना झाली.

वितरण केंद्रावर वैद्यकीय पथक व रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच निवडणूक कर्तव्यावर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचा मतदानाचा हक्क अबाधित राहावा, यासाठी टपाली मतदान सुविधा केंद्र कार्यरत ठेवण्यात आले होते. मतदान पथकांनी चेकलिस्टनुसार ईव्हीएम व साहित्याची तपासणी करून संबंधित मतदान केंद्राशी जुळणी केली.

प्रत्येक मतदान केंद्रासाठी १ मतदान केंद्राध्यक्ष, ३ मतदान अधिकारी, १ शिपाई व १ पोलीस कर्मचारी असे पथक नेमण्यात आले आहे. एकूण १,१९५ मतदान अधिकारी व सुमारे ३०० पोलीस कर्मचारी या प्रक्रियेत सहभागी झाले आहेत. वाहतुकीसाठी ३८ एस.टी. बसेस व २० जीप्स उपलब्ध करून देण्यात आल्या असून, २४ क्षेत्रीय अधिकारी संपूर्ण प्रक्रियेवर समन्वय साधत आहेत.

आंबेगाव तालुक्यातील ५ जिल्हा परिषद गट व १० पंचायत समिती गणांसाठी मतदान ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत होणार आहे. मतदान प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पडण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी गोविंद शिंदे यांनी स्पष्ट केले.

# बढेकर मळ्यात शेतकऱ्यावर बिबट्याचा जीवघेणा हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ गव्हाच्या शेतात पाणी भरताना अचानक हल्ला; किरण बढेकर जखमी, प्रकृती स्थिर

**लोणी-धामणी :** जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील लोणी-पारगाव रस्त्यालगत असलेल्या बढेकर मळा परिसरात बिबट्याने शेतकऱ्यावर हल्ला केल्याची घटना घडली असून, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. गव्हाच्या शेतात पाणी भरत असताना किरण शांताराम बढेकर (वय ३७) या शेतकऱ्यावर बिबट्याने अचानक झडप घालून हल्ला केला. या हल्ल्यात बढेकर जखमी झाले आहेत.

ही घटना गुरुवार (दि. ०५) रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. अचानक झालेल्या हल्ल्याची तीव्रता ओळखून किरण बढेकर यांनी प्रसंगावधान राखत स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. मात्र, या झटापटीत त्यांच्या पाठीवर व हातावर बिबट्याच्या नखांचे ओरखडे बसले आहेत. घटनेची माहिती मिळताच वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. वनरक्षक योगेश निघोट, बिबट मित्र कृती दलाचे धर्मेंद्र ढगे, वारदत बांबळे, प्रज्वल आवारी यांनी जखमी किरण बढेकर यांना मंचर येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वनविभागाने दिली आहे.

आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात बिबट्यांचे पाळीव प्राण्यांवर हल्ले नियमित होत असून, आता मानवावर हल्ल्यांच्या घटनांमध्येही वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, ग्रामस्थांनी बिबट्या दिसताच आरडाओरड करून काठ्यांच्या साहाय्याने पाठलाग केला असता ही घटना घडल्याची माहिती वनविभागाने दिली आहे. घटनेनंतर नागरिकांच्या मागणीनुसार गुरुवार (दि. ०५) रोजी रात्री आठ वाजता घटनास्थळी पिंजरा लावण्यात आला आहे.

# लोणी येथे ५३ व्या वर्षी अखंड हरीनाम सप्ताहाचे भव्य आयोजन

### महाशिवरात्रीनिमित्त कीर्तन-प्रवचनांचा भक्तिमय सोहळा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** लोणी (ता. आंबेगाव) येथे महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त अखंड हरीनाम सप्ताह व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, यंदा या धार्मिक परंपरेला ५३ वर्षे पूर्ण होत आहेत. शनिवार (दि. ०७) ते रविवार (दि. १४ फेब्रुवारी) या कालावधीत हा भक्तिरसाने ओथंबलेला सप्ताह पार पडणार आहे. तसेच काल्याचे कीर्तन सोमवार (दि. १६) रोजी होणार आहे.

या सप्ताह काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती, अखंड वीणा वादन, सायंकाळी ४ ते ५ प्रवचन, ५ ते ६ हरिपाठ, तर रात्री ७ ते ९ हरिकीर्तन, रात्री ९ वाजता महाप्रसाद आणि १० नंतर हरिजागर असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

त्यामुळे संपूर्ण आठवडा लोणी गाव भक्ती, नामस्मरण आणि कीर्तनमय वातावरणात न्हालेला दिसणार आहे.

सप्ताहादरम्यान नामवंत कीर्तनकार व प्रवचनकारांचे मार्गदर्शन लाभणार आहे. प्रवचनासाठी हभप बबन महाराज सिनलकर, हभप उज्वला सुक्रे, हभप महादेव महाराज बढेकर, हभप ज्ञानेश्वर महाराज ढगे पाटील, हभप हनुमंत महाराज पोखरकर, हभप श्रीराम महाराज वाळूंज, हभप ज्ञानेश्वर महाराज थोरात, हभप नंदा आढाव, हभप किसन महाराज तांबे यांची उपस्थिती राहणार आहे.

तर हरिकीर्तनासाठी शनिवार (दि. ०७) हभप वैभव महाराज राक्षे (देहू), रविवार (दि. ०८) हभप गणेश महाराज घोडेकर (कळंब), सोमवार (दि. ०९) हभप जनार्दन महाराज रजपूत (धुळे), मंगळवार (दि. १०) हभप भरत महाराज थोरात (राजगुरुनगर), बुधवार (दि. ११) हभप जयेश महाराज भाग्यवंत (डोंबिवली), गुरुवार (दि. १२) हभप दादा महाराज वायसळ (गंगापूर), शुक्रवार (दि. १३) हभप डॉ. विकासनंद महाराज मिसाळ (पिंपळगाव वाघा) आणि शनिवार (दि. १४) हभप सुदर्शन महाराज शास्त्री (त्रिभुवनेश्वर देवस्थान, पाथर्डी) यांची कीर्तने होणार आहेत.

रविवार (दि. १५) हभप बाळासाहेब महाराज रंजाळे (श्रीरामपूर) यांचे कीर्तन तर सोमवार (दि. १६) रोजी सकाळी ८.३० ते १०.३० दरम्यान हभप लक्ष्मण महाराज नागरे (देवगड, नेवासा) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

दररोज कीर्तनानंतर रात्री ९ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, या महाप्रसादाचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा, असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# डांबरी रस्त्यावर कच टाकल्याने भोईटे मळ्यात धुळीचे साम्राज्य

### सणसर फूट रस्ता-३६ फाटा मार्गावरून उडणाऱ्या धुळीमुळे ग्रामस्थ त्रस्त, आजारांचे प्रमाण वाढले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**भवानीनगर :** सणसर (ता. इंदापूर) येथील सणसर फूट रस्ता ते ३६ फाटा या डांबरी रस्त्यावर कच टाकण्यात आल्याने भोईटे मळा परिसरातील ग्रामस्थ धुळीने अक्षरशः हैराण झाले आहेत. या धुळीमुळे अनेक नागरिकांना सर्दी, खोकला, श्वसनाचे त्रास सुरू झाले असून आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

सुमारे दोन किलोमीटर लांबीचा हा रस्ता सपकळवाडीला जोडणारा महत्त्वाचा मार्ग असून, गेल्याच वर्षी या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. मात्र, मागील एक महिन्यापासून भोईटे वस्ती परिसरात या रस्त्यावर बारीक कच टाकण्यात आला आहे. हा कच नेमका कोणी व कशासाठी टाकला, याची माहिती ग्रामस्थांना नाही.

डांबरी रस्त्यावर कच पसरल्यामुळे दुचाकी व चारचाकी वाहने गेल्यानंतर मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना दाट लोकवस्ती असल्याने या धुळीचा थेट परिणाम घरांमध्ये होत आहे. घरांमध्ये सतत धूळ साचत असून नागरिकांना दैनंदिन जीवन जगणे कठीण झाले आहे.

धुळीच्या त्रासामुळे लहान मुले, वृद्ध आणि महिलांच्या आरोग्यावर अधिक परिणाम होत असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. अनेकांना सर्दी-खोकला, डोळ्यांची जळजळ व श्वसनाचा त्रास जाणवू लागला आहे. त्यामुळे भोईटे मळ्यातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकाराकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने लक्ष देऊन रस्त्यावर टाकलेला कच काढावा आणि धुळीचा बंदोबस्त करावा, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे.

# पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील वाहतूककोंडीवर संताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ पायाभूत सुविधा व आपत्कालीन पर्यायी व्यवस्थेची जोरदार मागणी

**चाकण :** पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर सातत्याने उद्भवणाऱ्या वाहतूककोंडीमुळे प्रवासी, वाहतूक संघटना, उद्योजक आणि व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे आणि अपुऱ्या आपत्कालीन व्यवस्थेमुळे सामान्य प्रवाशांसह उद्योग, व्यापार आणि कृषी क्षेत्राला मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर महामार्गावर तातडीने पायाभूत सुविधा मजबूत करून सुरक्षित पर्यायी आपत्कालीन व्यवस्था उभारण्याची मागणी करण्यात आली असून, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवण्यात आले आहे.

मंगळवारी (३ फेब्रुवारी) आडोशी, बोरघाट बोरघाटाजवळ रासायनिक वायू वाहून नेणारा टँकर पलटी झाल्यानंतर पुणे-मुंबई दिशेने तब्बल ३० ते ४० किलोमीटर लांबीची वाहतूककोंडी निर्माण झाली. या घटनेमुळे महामार्गावर सुमारे ३२ तास वाहने एकाच ठिकाणी अडकून पडली. एसटी महामंडळाच्या बसेस, खासगी प्रवासी बस, औद्योगिक अवजड वाहने, कच्चा माल वाहणारे ट्रक, फळ-भाजीपाला, दूध व दुग्धजन्य पदार्थांचे टँकर, वैद्यकीय उपकरणे आणि ऑक्सिजन वाहनेही या कोंडीत अडकली होती. दीर्घकाळ वाहतूक ठप्प राहिल्याने नाशवंत माल खराब होऊन मोठे आर्थिक नुकसान झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

# बारामतीत निवडणूक तयारी पूर्ण

### ईव्हीएम मशीन मतदान केंद्रांवर दाखल : वैभव नावडकर

+ जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बारामती :** बारामती तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासनाने संपूर्ण तयारी पूर्ण केली असून निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. तालुक्यातील ६ जिल्हा परिषद गट आणि १२ पंचायत समिती गणांसाठी होणाऱ्या या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हा क्रीडा संकुल, बारामती येथून निवडणूक साहित्याचे वितरण करण्यात आले होते. दीर्घकाळ सर्व मतदान पथके त्यांच्या संबंधित मतदान केंद्रांवर सुरक्षितपणे रवाना करण्यात आली.

तालुक्यातील एकूण २११ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. यासाठी २११ कंट्रोल युनिट आणि २४५ बॅलेट युनिट मतदान केंद्रांवर वितरित करण्यात आले आहेत. ईव्हीएम मशिनसह मतदान साहित्याची तपासणी करूनच पोलिंग पार्ट्यांना केंद्रांकडे पाठवण्यात आले. सर्व मतदान पथके आवश्यक साहित्यासह वेळेत केंद्रांवर पोहोचल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. मतदान कर्मचाऱ्यांच्या सुरक्षित आणि सुलभ प्रवासासाठी ४६ बसेस आणि १७ जिप्सी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शांततापूर्ण आणि सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाने मनुष्यबळ, वाहतूक व्यवस्था, तांत्रिक सहाय्य तसेच सुरक्षा यंत्रणेचे काटेकोर नियोजन केले आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर आवश्यक कर्मचारी, पोलीस बंदोबस्त व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

लोकशाहीचा उत्सव यशस्वी करण्यासाठी प्रशासनाच्या पातळीवर विशेष दक्षता घेण्यात येत आहे. मतदानाच्या दिवशी कोणताही गोंधळ किंवा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी वरिष्ठ अधिकारी स्वतः परिस्थितीवर लक्ष ठेवणार आहेत. तसेच, मतदान प्रक्रिया पूर्णपणे निष्पक्ष व पारदर्शक राहील, याची खबरदारी घेण्यात आली आहे.

दरम्यान, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या या निवडणुकीत सर्व पात्र मतदारांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी केले आहे.

प्रशासनाच्या नियोजनबद्ध तयारीमुळे बारामती तालुक्यातील निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि यशस्वीपणे पार पडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# दोन सराईत गुन्हेगार एक वर्षासाठी पुणे जिल्ह्यातून हद्दपार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

+ कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांचा निर्णायक निर्णय

**मंचर :** मंचर पोलीस स्टेशन हद्दीतील दोन सराईत गुन्हेगारांवर एक वर्षासाठी पुणे जिल्ह्यातून हद्दपारीची कठोर कारवाई करण्यात आली आहे. गोट्या ऊर्फ हर्षद दत्तात्रय तांदळे (वय २५, रा. मंचर) आणि विकास झुंबर जारकड (वय ४६, रा. अवसरी बु., जारकडमळा, ता. आंबेगाव) अशी हद्दपार करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

सदर दोन्ही आरोपींवर खुनाचा प्रयत्न, गंभीर मारहाण, चोरी यांसारखे अनेक गंभीर गुन्हे दाखल असून, त्यांच्या दहशतीमुळे परिसरातील सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. यापूर्वी वेळोवेळी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली होती. मात्र, त्यांच्या वर्तणुकीत कोणतीही सुधारणा होत नसल्याचे पोलीस तपासातून स्पष्ट झाले.

सार्वजनिक शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मंचर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी या दोघांविरोधात हद्दपारीचा प्रस्ताव वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केला होता. हा प्रस्ताव पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल यांच्या मार्फत उपविभागीय अधिकारी (जुन्नर-आंबेगाव उपविभाग) यांच्याकडे पाठविण्यात आला. प्रस्तावावर सुनावणी करून उपविभागीय अधिकाऱ्यांनी दि. २२ जानेवारी २०२६ रोजी आदेश पारित केले. त्यानुसार दि. २८ जानेवारी २०२६ ते दि. २७ जानेवारी २०२७ या कालावधीसाठी दोन्ही आरोपींना पुणे जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले आहे.

### हरिनाम गजरात शोकाकुल वातावरणात अस्थिकलश मिरवणूक; आळंदीत भावपूर्ण श्रद्धांजली

# अलंकापुरी इंद्रायणी नदीत स्व. अजितदादा पवार यांच्या अस्थींचे विसर्जन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**आळंदी :** राज्याचे उपमुख्यमंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जनतेच्या मनावर अधिराज्य गाजविणारे स्वर्गीय श्री. अजितदादा पवार यांच्या अस्थींचे अलंकापुरी आळंदी येथील पवित्र इंद्रायणी नदीत विधिवत विसर्जन करण्यात आले. या प्रसंगी संपूर्ण आळंदी नगरी शोकसागरात बुडाली होती. हरिनाम गजरात काढण्यात आलेली अस्थिकलश रथ मिरवणूक पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले.

आळंदीतून वडगाव चौक ते इंद्रायणी नदी घाट या दरम्यान स्व. अजितदादा पवार यांचा अस्थिकलश रथातून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीदरम्यान वारकरी संप्रदायाच्या हरिनाम गजराने परिसर भक्तिमय व भावनात्मक झाला होता. नागरिक, भाविक, वारकरी मोठ्या संख्येने रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून अंतःकरणपूर्वक श्रद्धांजली अर्पण करत होते. या भावपूर्ण प्रसंगी माजी आमदार विलास लांडे, आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, प्रदेश प्रतिनिधी डी.डी. भोसले पाटील, गटनेते सचिन गिलबिले, विरोधी पक्ष गटनेते आदित्य घुंडरे, नगरसेवक दिनेश घुले, सुरेश झोंबाडे, माजी नगरसेवक प्रकाश कुऱ्हाडे पाटील, मंगला वेळकर, बाबासाहेब ठाकूर, उत्तम गोगावले, शाम कोलन, माऊली कुऱ्हाडे, उद्योजक सुधीर मुंगसे, महेश गोरे, संकेत वाघमारे, विमल ठाकूर, संदीप नाईकरे, किरण येळवंडे यांच्यासह सर्व पक्षीय पदाधिकारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, कार्यकर्ते, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

इंद्रायणी नदी घाटावर अस्थिकलशाचे विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. अभिवादन सभेत अनेक मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करताना अजितदादांच्या सामाजिक, राजकीय व जनहितकारी कार्याचा गौरव केला. त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या विकासकामांची आठवण उपस्थितांनी काढली. अस्थिकलश दर्शनासाठी इंद्रायणी नदी घाटावर भाविक व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. धार्मिक परंपरेनुसार विधी पूर्ण केल्यानंतर हरिनाम गजरात, वारकरी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत अस्थींचे विसर्जन इंद्रायणी नदीत करण्यात आले. यावेळी "अजितदादा पवार अमर रहे", "एकच वादा अजित दादा" अशा घोषणा परिसरात घुमत होत्या.

अंतिम टप्प्यात पसायदानाने अस्थिकलश विसर्जन मिरवणुकीची सांगता झाली. सर्व पक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, आळंदी ग्रामस्थ व वारकरी यांच्या उपस्थितीत पार पडलेला हा सोहळा श्रद्धा, भक्ती आणि शोकभावनेने भारलेला होता.

# मंचर परिसरात मादी बिबट जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** आंबेगाव तालुक्यातील मंचर शहरालगत असलेल्या मुळेवाडी येथील वाघ वस्ती परिसरात लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात मादी बिबट जेरबंद झाल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले यांनी दिली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला आहे.

मंचर शहराच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणावर शेतशिवार असून, या भागात बिबट्याचा वावर वारंवार आढळून येतो. विशेषतः मोरडेवाडी परिसर, माळीवाडा व जुना चांडोली रोड या भागात नागरिकांना बिबट्याचे दर्शन होत असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. माळीवाडा परिसरातील वाघ वस्ती येथे शेतकरी दिवसा पाणी भरत असताना अनेक वेळा बिबट्याचे दर्शन झाल्याने ग्रामस्थ भयभीत झाले होते. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी वनविभागाकडे पिंजरा लावण्याची मागणी केली होती. त्यानुसार वनविभागाने वाघ वस्ती परिसरात पिंजरा लावला होता. काल रात्रीच्या सुमारास या पिंजऱ्यात एक मादी बिबट अडकली, याची माहिती नागरिकांनी वनविभागाला दिली.

माहिती मिळताच वनरक्षक आदर्श जगताप, बिबट कृती दलाचे बापू वाघ, हर्षल गावडे, प्रकाश हिले, दिपक भोंडवे व ऋषिकेश कोकणे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन मादी बिबट सुरक्षितपणे ताब्यात घेतला. जेरबंद करण्यात आलेल्या मादी बिबटला आरोग्य तपासणीसाठी अवसरी घाट येथील वन उद्यानात नेण्यात आले असल्याचे वनविभागाने सांगितले. वनविभागाच्या तत्परतेमुळे संभाव्य अनर्थ टळला आहे.

## सारांश वृत्त

### कार्ल मार्क्सच्या पुतळ्याचे अनावरण

**चेन्नई :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी शुक्रवारी येथे जर्मन तत्वज्ञानी आणि राजकीय सिद्धांतकार कार्ल मार्क्स यांच्या पुतळ्याचे अनावरण केले. त्यांनी एप्रिल २०२५ मध्ये राज्य विधानसभेत घोषणा केली होती की द्रविड मॉडेल सरकार कार्ल मार्क्सचा सन्मान आणि स्मरण करण्याचा मानस आहे, ज्यांना त्यांनी क्रांतिकारी जागतिक नेते म्हणून वर्णन केले होते. त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांसह, मुख्यमंत्र्यांनी ८५.८० लाख रुपये खर्चून उभारलेल्या पुतळ्याचे अनावरण केले आणि यावेळी पुष्पांजली वाहिली.

### मतभेदाचे वृत्त कार्ती यांनी फेटाळले

**चेन्नई :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कार्ती पी. चिदंबरम यांनी शुक्रवारी तामिळनाडूमध्ये द्रमुकच्या नेतृत्वाखालील आघाडीतील मतभेदाचे वृत्त फेटाळून लावले आणि असे प्रतिपादन केले की राज्यातील द्रविड प्रमुखांच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडी एकसंध आहे. येथे बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, गटाची रचना आणि जागावाटप व्यवस्था सामान्यतः निवडणुकीपूर्वीच ठरविली जाते आणि त्याकडे वादाचा मुद्दा म्हणून पाहिले जाऊ नये.



### अंबाला न्यायालय परिसरात छापा

**अंबाला :** न्यायालयाच्या अधिकाऱ्याला ईमेलद्वारे बॉम्बची धमकी मिळाल्यानंतर शुक्रवारी अंबाला जिल्हा न्यायालय संकुलात छापे टाकण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले. शोध मोहिमेदरम्यान काहीही संशयास्पद आढळले नाही, असेही त्यांनी सांगितले. पोलिसांना सूचना मिळताच, बॉम्ब निकामी करणारे पथक आणि स्निफर डॉग घटनास्थळी पोहोचले आणि न्यायालयाच्या परिसरात कसून तपासणी करण्यात आली, असे त्यांनी सांगितले.

## ट्रम्प यांचे म्हणणे भारताने पुन्हा नाकारले

# भारत–पाक संघर्ष रोखल्याचा पुन्हा दावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी गुरुवारी पुन्हा एकदा त्यांच्या प्रशासनाने भारत आणि पाकिस्तानमधील संभाव्य युद्ध रोखल्याचा दावा केला आहे. राष्ट्रीय प्रार्थना नाश्त्यात भाषण करताना तसेच 'ट्रुथ सोशल'वरील पोस्टद्वारे ट्रम्प यांनी हा दावा पुनरावृत्त केला असून, नवी दिल्लीने मात्र यापूर्वीप्रमाणेच हा दावा ठामपणे फेटाळला आहे.

ट्रम्प म्हणाले की, त्यांनी एका वर्षात "आठ भयंकर युद्धे संपवली", ज्यामध्ये कंबोडिया–थायलंड, कोसोवो–सर्बिया, आर्मेनिया–अझरबैजान तसेच भारत–पाकिस्तान यांच्यातील संघर्षांचा समावेश आहे. त्यानंतर सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी भारत आणि पाकिस्तानमधील अणुयुद्ध थांबवल्याचा दावाही केला.



ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये अमेरिकेच्या लष्करी सामर्थ्याचा उल्लेख करत, पहिल्या कार्यकाळात सैन्याची पूर्ण पुनर्बांधणी केल्याचे, नव्या आणि नूतनीकरण केलेल्या अण्वस्त्रांचा समावेश केल्याचे तसेच 'स्पेस फोर्स'ची स्थापना केल्याचे नमूद केले. त्यांनी युद्धनौकांच्या क्षमतेचे वर्णन करत दुसऱ्या महायुद्धातील नौकांपेक्षा त्या कितीतरी पटीने शक्तिशाली असल्याचेही सांगितले.

गेल्या वर्षी १० मे रोजी ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान वॉशिंग्टनच्या मध्यस्थीने "पूर्ण आणि तात्काळ" युद्धबंदीवर सहमत झाल्याची घोषणा केली होती. मात्र भारताने हा दावा तत्काळ नाकारत, पाकिस्तानसोबतचे सर्व प्रश्न द्विपक्षीय पद्धतीनेच सोडवले जातील, कोणत्याही तृतीय पक्षाच्या मध्यस्थीला स्थान नाही, अशी भूमिका स्पष्ट केली होती.

नियंत्रण रेषेवरील युद्धबंदी ही दोन्ही देशांमधील थेट संवादाचा परिणाम असून त्यामध्ये कोणताही बाह्य सहभाग नव्हता, यावर नवी दिल्लीने सातत्याने भर दिला आहे. परराष्ट्र धोरणात द्विपक्षीयतेचा सिद्धांत कायम ठेवणे ही भारताची अधिकृत भूमिका आहे. पाकिस्तानने मात्र भूतकाळात या प्रदेशात अमेरिकेच्या भूमिकेचे स्वागत केले असले, तरी ट्रम्प यांच्या दाव्यांना दुजोरा देणारी ठोस माहिती इस्लामाबादकडूनही सादर करण्यात आलेली नाही.

महत्त्वाचे म्हणजे, ट्रम्प यांनी सार्वजनिक भाषणे आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आतापर्यंत ९० हून अधिक वेळा भारत–पाक संघर्ष रोखल्याचा दावा केल्याचे नोंदवले गेले आहे. मात्र भारताकडून प्रत्येक वेळी त्याला स्पष्ट आणि ठाम नकार दिला जात आहे.

# सात वर्षांपर्यंतच्या गुन्ह्यांत नोटीस न देता अटक नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा असलेल्या गुन्ह्यांमध्ये आरोपींना थेट अटक न करता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ च्या कलम ३५(३) अंतर्गत आधी नोटीस देणे पोलिसांसाठी अनिवार्य असल्याचा स्पष्ट निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला.

नोटीस देण्याची प्रक्रिया पूर्ण न झाल्यास अशा प्रकरणांत अटक करता येणार नाही, असे न्यायालयाने ठामपणे नमूद केले.

न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, अटक ही नियमित किंवा स्वयंचलित प्रक्रिया ठरू शकत नाही. अटक ही "विवेकाधीन आणि ऐच्छिक" कृती असून ती प्रत्येक प्रकरणातील तथ्ये, गरज आणि कायदेशीर अटी लक्षात घेऊनच करण्यात यावी.

तपास यंत्रणांनी पहिल्या टप्प्यात आरोपीला थेट अटक न करता नोटीस बजावावी, असे निर्देश न्यायालयाने दिले.

न्यायालयाने म्हटले आहे की, सात वर्षांपर्यंतच्या शिक्षेच्या गुन्ह्यांमध्ये अटक न्याय्य, तर्कसंगत आणि पारदर्शक असली पाहिजे. बीएनएसएस कलम ३५(१)(ब) अंतर्गत अटक करण्यासाठी आवश्यक परिस्थिती अस्तित्वात असल्या तरी, त्या पूर्णपणे सिद्ध झाल्याशिवाय अटक करता येणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. नोटीस बजावल्यानंतर अटक करण्याचा अधिकारसुद्धा अत्यंत सावधपणे आणि संयमाने वापरणे अपेक्षित आहे, असे निरीक्षण नोंदवण्यात आले.

दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने बीसीसीआयचे माजी अध्यक्ष अनुराग ठाकूर यांना दिलासा देत, २०१७ मधील आदेशात बदल केला. नियम आणि कायद्यांनुसार ठाकूर आता क्रिकेट बोर्डाच्या कारभारात सहभागी होऊ शकतात, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# पुस्तकाला पुस्तकांनीच प्रत्युत्तर देणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राहुल गांधी यांनी एका पुस्तकाचा संदर्भ देत भाजपवर टीका केल्यानंतर, भाजपकडूनही पुस्तकांच्या माध्यमातूनच प्रत्युत्तर देण्यात आले. भाजप खासदार निशिकांत दुबे बुधवारी संसदेत अनेक प्रकाशित तसेच बंदी घातलेल्या पुस्तकांची मुखपृष्ठे घेऊन आले. काँग्रेसवर इतिहास लपविल्याचा आरोप करत त्यांनी आक्रमक भूमिका घेतली, ज्यामुळे लोकसभेत मोठा गोंधळ झाला. या पार्श्वभूमीवर आता दुबे यांनी नेहरू–गांधी कुटुंबावर आधारित स्वतंत्र ग्रंथालय उभारण्याची घोषणा केली आहे.

सोशल मीडियावर केलेल्या पोस्टमध्ये दुबे यांनी सांगितले की, नेहरू–गांधी कुटुंबाच्या राजकीय कारकिर्दीतील निर्णय, त्यांच्यावर झालेले भ्रष्टाचाराचे आरोप, तसेच त्यांच्या धोरणांमुळे देशाला झालेल्या आर्थिक व सामाजिक परिणामांचे दस्तऐवजीकरण करणारी पुस्तके या ग्रंथालयात संग्रहित केली जातील. हे ग्रंथालय भावी पिढ्या आणि संशोधन विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल, असा दावा त्यांनी केला आहे.

दुबे यांनी पोस्ट केलेल्या व्हिडिओमध्ये संसदेत झालेल्या त्यांच्या भाषणाचा उल्लेख करत सांगितले की, देशभरातून त्यांना मोठा प्रतिसाद मिळाला. अनेकांनी दूरध्वनी करून पाठिंबा दर्शविल्यानंतरच हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रस्तावित ग्रंथालयात नेहरू–गांधी कुटुंबावर लिहिलेली, तसेच त्यांच्या निर्णयांमुळे देशाला झालेल्या कथित नुकसानीचा ऊहापोह करणारी पुस्तके असतील, असेही त्यांनी नमूद केले.

याशिवाय, अद्याप सार्वजनिक क्षेत्रात न आलेली काही कागदपत्रे आणि अहवाल, त्यात शाह आयोगाच्या अहवालाचाही समावेश, या ग्रंथालयात उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे दुबे यांनी सांगितले.

# बिहार निवडणूक आव्हानावर सुनावणीस नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या आचरण आणि निकालाला आव्हान देणाऱ्या प्रशांत किशोर यांच्या नेतृत्वाखालील जनसुराज पक्षाच्या याचिकेवर सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी नकार दिला. केवळ एखाद्या राजकीय पक्षाच्या असमाधानाच्या आधारे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया आणि निकाल बाजूला ठेवण्यासाठी सर्वमान्य निर्देश देणे शक्य नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.



भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्या पक्षाला त्यांच्या तक्रारींसह पाटणा उच्च न्यायालयात जाण्याचे निर्देश दिले. अशा स्वरूपाच्या आव्हानासाठी सर्वोच्च न्यायालय हे पहिले व्यासपीठ ठरू शकत नाही, असे निरीक्षणही खंडपीठाने नोंदवले.

नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत जनसुराज पक्षाने २३८ जागांवर उमेदवार उभे केले होते. मात्र, पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही आणि बहुतेक उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली. या निकालानंतर पक्षाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेत संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

याचिकेत जनसुराज पक्षाने असा आरोप केला होता की, निवडणूक वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर बिहार सरकारने मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत महिला लाभार्थ्यांना प्रत्येकी १०,००० रुपयांचे हस्तांतरण केले. हे हस्तांतरण आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन असून, मतदारांना प्रलोभन देणारे असल्याचा दावा पक्षाने केला. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेची निष्पक्षता बाधित झाल्याचा आरोप करण्यात आला.

संविधानाच्या कलम ३२४ आणि लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम १२३ अंतर्गत या प्रकरणाची 'भ्रष्ट प्रथा' म्हणून चौकशी करण्याचे निर्देश भारतीय निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने या टप्प्यावर हस्तक्षेप करण्यास नकार देत, संबंधित बाबींचा विचार करण्यासाठी योग्य मंच म्हणून पाटणा उच्च न्यायालयाकडे जाण्याचा सल्ला दिला.

# बिहार विधानसभा निकालाला आव्हान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** माजी निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांच्या नेतृत्वाखालील जनसुराज पक्षाने बिहार विधानसभा निवडणूक २०२५ च्या निकालाला आव्हान देत सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. राज्यात नव्याने निवडणुका घेण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर होण्याची शक्यता आहे.

बिहारमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) मोठा विजय मिळवत २४३ पैकी २०२ जागा जिंकल्या. विरोधकांना केवळ ३५ जागांवर समाधान मानावे लागले, त्यात काँग्रेसच्या सहा जागांचा समावेश होता. या निवडणुकीत जनसुराज पक्षाला एकही जागा मिळवता आली नाही. पक्षाच्या बहुतांश उमेदवारांना अनामत रक्कमही गमवावी लागली.

जनसुराज पक्षाने आपल्या याचिकेत बिहार सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत राज्यातील महिलांना प्रत्येकी १० हजार रुपये थेट हस्तांतरित करून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करण्यात आल्याचा दावा पक्षाने केला आहे. ही रक्कम मतदारांना प्रभावित करण्यासाठी देण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. या प्रकरणी संविधानाच्या कलम ३२४ तसेच लोकप्रतिनिधी कायद्याच्या कलम १२३ अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावेत, अशी मागणी जनसुराज पक्षाने केली आहे. कलम ३२४ अंतर्गत निवडणूक प्रक्रियेचे पर्यवेक्षण आणि नियंत्रण निवडणूक आयोगाकडे असते, तर कलम १२३ अंतर्गत भ्रष्ट आचारांची व्याख्या करण्यात आली आहे.

## तेलंगणा विधानसभा अध्यक्षांना सर्वोच्च आदेश

# ...अन्यथा अवमान कारवाई होणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** तेलंगणा विधानसभेतील भारत राष्ट्र समिती (बीआरएस)च्या दहा आमदारांच्या काँग्रेसमध्ये पक्षांतराशी संबंधित प्रलंबित अपात्रता याचिकांवर तीन आठवड्यांच्या आत निर्णय न झाल्यास अवमान कारवाई केली जाईल, असा अंतिम इशारा सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी तेलंगणा विधानसभा अध्यक्षांना दिला. आमदारांनी दाखल केलेल्या अवमान याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती ए. जी. मसीह यांच्या खंडपीठाने ही भूमिका स्पष्ट केली.

सुनावणीदरम्यान, विधानसभा अध्यक्षांच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील अभिषेक सिंघवी यांना न्यायमूर्ती करोल यांनी तीव्र शब्दांत सुनावले. "या प्रकरणाचे 'रील' बनवू नका. जे घडते आहे ते गंभीर आहे. हा विलंब आता एक नवा उद्योगच बनत आहे," अशी टिप्पणी खंडपीठाने केली. सिंघवी यांनी एका प्रकरणात निर्णय झाला असून उर्वरित दोन प्रकरणांमध्ये अध्यक्ष निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत असल्याचे सांगितले. तसेच नगरपालिका निवडणुकांचा संदर्भ देत उर्वरित याचिकांवर निर्णय घेण्यासाठी तीन आठवड्यांची मुदत मागितली. याला बीआरएस आमदारांच्या वकिलांनी विरोध केला. अध्यक्षांनी यापूर्वीही वेळ मागितली असून आतापर्यंत केवळ एकच बैठक झाल्याचा दावा त्यांनी केला. मागील सुनावणीत अध्यक्षांनी तीन आठवड्यांची मुदत मागितली होती; मात्र प्रगती तपासण्यासाठी न्यायालयाने दोन आठवड्यांचीच मुदत दिली होती, याची आठवण खंडपीठाने करून दिली. "आम्हाला अपेक्षा आहे की अध्यक्ष सकारात्मक निर्णय घेतील; अन्यथा अवमान कारवाई सुरू केली जाईल," असे न्यायालयाने ठामपणे सांगितले.

यापूर्वी १६ जानेवारी रोजी सर्वोच्च न्यायालयाने या अपात्रता याचिकांवरील निर्णयाबाबतची स्थिती दोन आठवड्यांत सादर करण्याचे निर्देश दिले होते. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी, निर्देशांचे पालन न केल्याबद्दल अध्यक्षांना अवमान नोटीसही बजावण्यात आली होती. ३१ जुलै रोजी दिलेल्या निकालात, अपात्रतेच्या याचिकांवर निर्णय घेताना अध्यक्ष दहाव्या अनुसूचीखाली न्यायाधिकरण म्हणून काम करतात आणि त्यांना कोणतीही "संवैधानिक उन्मुक्ती" नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले होते.

# भारत टॅक्सी सेवेला नवी दिल्लीत प्रारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशात ओला आणि उबरसारख्या खासगी टॅक्सी सेवांना पर्याय देणारी 'भारत टॅक्सी' ही नवी सहकारी तत्त्वावर आधारित टॅक्सी सेवा सुरू करण्यात आली आहे. या सेवेचे वैशिष्ट्य म्हणजे चालक केवळ सेवा पुरवठादार नसून सेवेचे भागीदार आणि मालक असतील. कोणत्याही राईडवर चालकांकडून कमिशन आकारले जाणार नसल्याचा दावा कंपनीकडून करण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांना परवडणारे आणि स्थिर भाडे, तर चालकांना अधिक




उत्पन्न मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सध्या 'भारत टॅक्सी' ॲपची सेवा दिल्ली-एनसीआरपुरती मर्यादित असून, लवकरच देशभर विस्तार करण्याची योजना आहे. या सेवेचा उद्देश पाऊस, गर्दी किंवा पीक अवर्समध्ये अचानक भाडेवाढ होणार नाही, याची खात्री देणे हा आहे. त्यामुळे प्रवाशांना प्रवासाचा खर्च आधीच निश्चित कळेल आणि अनपेक्षित दरवाढीचा फटका बसणार नाही.

या नव्या मॉडेलमुळे प्रवाशांना स्वस्त, स्वच्छ आणि त्रासमुक्त टॅक्सी सेवा मिळेल, असा दावा करण्यात आला आहे. भाडे कायम स्थिर असल्याने प्रवास अधिक विश्वासार्ह होईल. दुसरीकडे, चालकांना प्रत्येक राईडवर कमिशन द्यावे लागणार नसल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच चालकांसाठी आरोग्य विमा आणि अपघात विम्यासारख्या सुविधा देण्याचेही आश्वासन देण्यात आले आहे. 'भारत टॅक्सी' ही सेवा सहकारी तत्त्वावर चालणार असून, त्यात चालक सेवेचे भागधारक असतील. यामुळे ते केवळ कामगार न राहता निर्णयप्रक्रियेतही सहभागी होतील. वाढीव भाडे (सर्ज प्रायसिंग) नसल्याने दर नियंत्रणात राहतील, असा दावा करण्यात आला आहे. या मॉडेलमुळे टॅक्सी बाजारात चालक-केंद्रित आणि प्रवासीहिताची नवी दिशा मिळेल, असे समर्थकांचे मत आहे. देशातील टॅक्सी सेवेच्या क्षेत्रात 'भारत टॅक्सी' हा एक वेगळा आणि नवा प्रयोग म्हणून पाहिला जात आहे.

### शेतकऱ्याला हनी ट्रॅपमध्ये अडकवले

**मथुरा (उत्तर प्रदेश) :** एका शेतकऱ्याला हनी ट्रॅपमध्ये अडकवल्याबद्दल आणि त्याची जमीन विकून मोठ्या प्रमाणात पैसे मिळवणाऱ्या शेतकऱ्याकडून पैसे उकळल्याबद्दल दोन पोलिसांना निलंबित करण्यात आले आहे, असे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने शुक्रवारी सांगितले. पोलिसांनी एका गावातील प्रधानासोबत काम करून शेतकऱ्याकडून पैसे उकळल्याचा आरोप आहे. वरिष्ठ पोलिस अधीक्षक श्लोक कुमार म्हणाले की, आग्रा येथील शेतकरी जगदीश यांनी जमीन विकली होती.

# शाहबाज शरीफ यांचे काश्मीरवर वादग्रस्त विधान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद :** पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरमुळे भारत–पाकिस्तान संबंध अधिकच ताणले गेले आहेत. या पार्श्वभूमीवर, ऑपरेशन सिंदूर अपयशी ठरल्याचा दावा करणारे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केले आहे. "काश्मीर पाकिस्तानचा भाग होईल," असे विधान त्यांनी गुरुवारी पाकव्याप्त काश्मीरमधील सभेत केले.

काश्मीर एकता दिनानिमित्त देशभरात रॅली आणि निदर्शने सुरू असताना, मुझफ्फराबादमधील विधानभवनासमोर उपस्थितांना संबोधित करताना शरीफ यांनी काश्मीरबाबत इस्लामाबादची पारंपरिक भूमिका पुनरुच्चारली. पाकिस्तान काश्मिरी लोकांच्या पाठीशी ठामपणे उभा असल्याचे त्यांनी सांगितले.

शरीफ म्हणाले की, "काश्मिरी लोकांच्या इच्छेचा आदर आणि संयुक्त राष्ट्रांच्या ठरावांची अंमलबजावणी—हाच जम्मू–काश्मीर प्रश्नावरील तोडगा आहे." पाकिस्तानची जनता आणि सरकार काश्मिरी लोकांच्या समर्थनार्थ उभे असल्याचा दावाही त्यांनी केला. यावेळी त्यांनी मोहम्मद अली जिना यांचा उल्लेख करत काश्मीरला पाकिस्तानची "रक्तवाहिनी" असे संबोधले आणि शांतता हवी असली तरी ती समानता व न्यायाच्या तत्त्वांवर आधारित असावी, असे म्हटले.

## पुढील २५ वर्षांत भात, गहू उत्पादनात मोठी घट; अन्नसुरक्षेला गंभीर धोका

# हवामान बदलाचा शेतीवर होतोय घातक परिणाम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** वाढत्या हवामान बदलामुळे भारताला आपल्या जमिनीचा, पीक उत्पादकतेचा आणि अन्नधान्याच्या पौष्टिक गुणवत्तेचा मोठा फटका बसण्याची शक्यता असून, विशेषतः कोरड्या आणि अर्धकोरड्या प्रदेशांमध्ये ही समस्या अधिक तीव्र होणार असल्याचा गंभीर इशारा भारतीय कृषी शास्त्रज्ञांनी दिला आहे. चालू भू-राजकीय संघर्षांमुळे जागतिक पातळीवर अन्नसुरक्षेचा प्रश्न दुर्लक्षित राहात असल्याबद्दलही त्यांनी चिंता व्यक्त केली.



दिल्लीतील भारतीय कृषी संशोधन संस्थेच्या (आयएआरआय) अभ्यासाचा हवाला देत शास्त्रज्ञांनी सांगितले की, सध्याची परिस्थिती कायम राहिल्यास पुढील २५ वर्षांत भात उत्पादनात सुमारे १५ टक्के, तर गहू उत्पादनात २० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते. याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर तसेच देशाच्या अन्नपुरवठ्यावर होणार आहे.

आंतरराष्ट्रीय अर्धकोरड्या प्रदेश संशोधन संस्थेचे (आयसीआरआयएसएटी) महासंचालक आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेचे माजी महासंचालक डॉ. हिमांशू पाठक यांनी सांगितले की, हवामान बदलामुळे प्रमुख पिकांचे उत्पादन सरासरी २० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. खारटपणा आणि जमिनीच्या ऱ्हासामुळे पारंपरिक शेतीचे क्षेत्र १५ ते २० टक्क्यांनी घटण्याची शक्यता आहे. यामुळे केवळ उत्पादनच नव्हे तर अन्नातील जस्त, लोह यांसारख्या सूक्ष्म पोषक घटकांचे प्रमाणही लक्षणीयरीत्या कमी होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

बनारस हिंदू विद्यापीठात आयोजित 'शाश्वत विकासासाठी हवामान-लवचिक शेती' या आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलताना पाठक म्हणाले की, वाढत्या जैविक ताणामुळे कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव वाढत असून, त्याचा फटका थेट शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला बसत आहे.

हवामान बदल आधीच वास्तव ठरल्याचे नमूद करताना पाठक यांनी बुंदेलखंडातील उदाहरण दिले. गेल्या वर्षी तेथे ४९ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली, तर ज्या भागात महिनाभरात साधारण ३० ते ४० मिमी पाऊस पडतो, तिथे अवघ्या एका तासात ३०७ मिमी पाऊस कोसळला. एकीकडे मुसळधार पावसामुळे पूरस्थिती, तर दुसरीकडे दीर्घ कोरड्या काळामुळे पिके करपण्याची परिस्थिती निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय पातळीवर युद्ध, ऊर्जा संघर्ष आणि राजकीय वादांवर भर दिला जात असताना उपासमारीविरुद्धची जागतिक लढाई मागे पडत असल्याची खंत पाठक यांनी व्यक्त केली. हवामान बदलासाठी सर्वात कमी जबाबदार असलेले गरीब देश आणि समाजच त्याचे सर्वाधिक बळी ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. मालदीवसारख्या बेट राष्ट्रांचे उदाहरण देत त्यांनी हवामान अन्यायाकडे लक्ष वेधले.

बनारस हिंदू विद्यापीठाचे प्रा. श्रवण सिंह यांनी सांगितले की, या परिषदेच्या माध्यमातून हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम, लवचिक आणि शाश्वत अन्न व्यवस्था उभारण्यासाठी धोरणात्मक दिशा निश्चित करण्यात मदत झाली आहे.